## नियमित दिवाणी दावा क्र. ३१/२०१३

## निशाणी १२९ खालील आदेश

प्रस्तुतचा विचाराधीन अर्ज हा वादी क्र. १ अ सुषमा सानू सावंत हिने तिच्याविरुध्द नि.१ वर दि.२०.०२.२०२५ रोजी विनाकैफियत झालेला आदेश रद्द होवून तिची कैफियत व म्हणणे स्वीकारण्याची विनंती केली आहे.

०२. वादी हिचे असे कथन आहे की, तिची सासू आजारी असल्याने सदर कामात तिला वेळीच कैफियत व म्हणणे देता आले नाही. तिने जाणुनबुजून विलंब केला नाही तसेच सदर दावा गुणदोषावर निकाली होण्याकरीता कैफियत व म्हणणे दाखल करुन घेतल्यास कोणावरही अन्याय होणार नाही. सबब, वादी हिने सदर आदेश रद्द करण्याची व तिची कैफियत व म्हणणे स्वीकारण्याची विनंती केली.

०३. प्रस्तुत अर्जावर प्रतिवादी क्र. २ यांनी म्हणणे दिले की, दावा बरेच वर्षे प्रलंबित आहे असून वादी जाणुनबुजून विलंब करीत आहेत. तसेच अर्ज हा मुदतबाह्य असल्याने फेटाळण्याची विनंती केली आहे.

०४. अर्जातील कथन व त्यावर दिलेले म्हणणे यांचे अवलोकन केले. तसेच दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकला. दाव्याच्या अभिलेखाचे व रोजनाम्याचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि.१८.०७.२०२३ रोजी वादी क्र. १ अ ह्या सदर दाव्यामध्ये हजर झाल्या. दि.१४.०३.२०२४ रोजी त्यांनी विधीज्ञ श्री.एस.एस.शेठ यांचे वकीलपत्र दाखल केले, परंतु कैफियत व म्हणणे दाखल करण्यासाठी मुदत मागितली. मुदत देवूनही त्यांनी कैफियत सादर केली नाही, त्यामुळे न्यायालयाने दि.२०.०२.२०२५ रोजी त्यांच्याविरुध्द विनाकैफियतचा आदेश पारीत केला. आजरोजी वादी यांनी प्रस्तुत विचाराधीन अर्जासोबत कैफियत व म्हणणे सादर केले आहे, परंतु ते मोठ्या विलंबानंतर केले आहे. प्रस्तुतचा दावा हा तुर्तातुर्त ताकिदीकरीता सादर केला आहे. याबाबत काही दुमत नाही की, नैसर्गिक न्यायाच्या दृष्टीने वादीला तिची बाजू मांडण्याची संधी दिली पाहिजे. वादीची कैफियत अभिलेखावर स्वीकारण्यात आली नाही तर प्रतिवादींच्या तुलनेत तिचे अधिक नुकसान होऊ शकते. वादींनी केलेल्या दिरंगाईबाबत प्रतिवादी यांना वादीकडून योग्य ती कॉस्ट देवून नुकसान भरपाई करता येईल. सबब, प्रस्तुतचा अर्ज हा मंजूर करण्यालायक आहे. करीता, खालील आदेश पारित करण्यात येत आहे.

# <u>आदेश</u>

०१. अर्ज **नि.१२९** मंजूर करण्यात येतो.

०२. वादीविरुद्ध विनाकैफियत दावा चालविण्याचा आदेश वादी यांनी प्रतिवादी यांना रु.५००/– कॉस्ट देण्याच्या अटीवर रद्द ठरविण्यात येत आहे.

०३. वादी यांनी वरील अटीची पुर्तता केल्यास विनाकैफियत आदेश रद्द समजला जाईल अन्यथा सदर आदेश 'जैसे थे' राहिल.

०४. वरील अटीची पुर्तता केल्यानंतर वादी यांनी या अर्जासोबत सादर केलेले म्हणणे व कैफियत अभिलेखावर घेण्यात येईल.

CHAVAN SANJAY MOTIRAM
Digitally signed by CHAVAN SANJAY MOTIRAM
Date: 2025.06.27 17:39:23 +0530

**(एस.एम. चव्हाण)**
**सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, खेड,**
**ता. खेड, जि. रत्नागिरी**

**दिनांकः २५.०६.२०२५**

CERTIFICATE

| | | |
|---|---|---|
| Case No. | : | R.C.S. No.31/2013 |
| I affirm that the contents of this pdf file order are same word as per original Judgment/order. | | |
| Name of Stenographer | : | Shri. S. J. Salunkhe |
| Court Name | : | Jt. CJJD & JMFC Court, Khed. |
| Date of Decision | : | 25.06.2025 |
| Order signed by Presiding Officer on | : | 25.06.2025 |
| Judgment/Order uploaded on | : | 27.06.2025 |